नियमित फौ. ख. क्र. ५१/२०२३
सरकार -वि.- बबन व इतर
नि.क्र. २४.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - तुकडु शिवाजी वैद्य,
वय ४५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – पुल्लर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.यू.मिरचे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावात राहतात. घटना ही १५.०६.२०२३ रोजी पुल्लर गावाच्या पानठेल्यावर संध्याकाळी ५.३० वाजता घडली होती. त्यावेळी माझ्याकडे कृषीकेंद्रातील दोन व्यक्ती पैसे मागण्याकरिता आले होते. त्यावेळी माझ्या घरी कोणी नसल्याने मी त्यांना घेवुन चहा पाणीकरिता ठेल्यावर गेलो. मी त्यावेळी चहा आणि खरार् घेतल्यानंतर बबन चौधरी तेथे आला व तेथे माझ्या डाव्या हातावर व मनगटावर काठीने मारले. त्यामुळे मी खाली बसलो. त्यावेळी बबनचा मावस भाऊ शुभम हा तेथे आला व त्याने माझ्या डाव्या कानावर वेळव्याचे काठीने मारले त्यामुळे माझा कान रक्त बंबाळ झाला. त्यानंतर रोहीत चौधरी तेथे आला व त्याने बबनच्या हातातील काठी घेवून माझ्या पाठीवर दोन ते तीन वार केले. त्यानंतर मी कसाबसा तेथून निघालो. कृषीकेंद्रातील दोघे व्यक्तींनी मला पोलीस स्टेशनला नेले. तेथे पोलिसांनी माझी परिस्थिती बघून मला प्रथम ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे पाठविले. त्यानंतर उपचार घेतल्यावर मी फियार्द देण्याकरिता पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही

आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येते. आता मला दाखविलेला छापील प्रथम खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येते. त्यानंतर पोलीस चौकशीकरिता आले होते. ज्या लाकडी काठींनी मला मारले ते मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविलेल्या जप्त काठ्या त्याच आहेत. त्यास **आर्टिकल 'अ व ब'** देण्यात येते. माझ्या मुलीने रोहीत चौधरीसोबत प्रेम विवाह केला होता. त्यानंतर ती काही दिवस त्याच्यासोबत राहिली, परंतु, तो तिला त्रास देवू लागला. त्यानंतर दिनांक १७.०६.२०२३ रोजी मी शेतात जात असताना रोहीत व माझी मुलगी मोटार सायकलने जात होते तेव्हा मी रोहीतला म्हणालो की, माझ्या मुलीला का त्रास देत आहे. त्यावरुन माझी व रोहीतची तोंडातोंडी झाली व त्यानंतर तो व माझी मुलगी निघून गेली.

सरतपास संपला.

<u>आरोपी तर्फे उलट तपास त्यांचे वकील श्री नागोसे यांचे मार्फत</u> -

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेत जमीनी धरणामध्ये गेल्या होत्या. माझ्याकडे तीन एकर शेती आहे. मी त्यामध्ये खाऊन पिऊन सुखी आहे. रोहीत हा खाजगी काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रोहीत हा खाजगी काम करत असल्यामुळे माझ्या मुलीचा त्यासोबतचा विवाह मान्य नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, रोहीत व माझ्या मुलीने बाहेर जावून लग्न केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे लग्न गावात झाले नव्हते. हे मला माहीत नाही की, त्यांनी नव दुर्गा मंदीर उमरेड येथे लग्न केले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर माझी मुलगी रोहीतसोबत राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीने रोहीतशी लग्न केल्याने मला आवडले नाही व बैचेन होते. हे

मला माहीत नाही की, माझी मुलगी रोहीतकडे राहत असताना घरीच राहत होती.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी अधून मधून घरी कोणी नसताना माझ्या मुलीला भेटायला जात होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी माझ्या मुलीला भेटायला गेल्यानंतर ती तिला वारंवार म्हणत होती की, रोहीत सोबत राहू नको, तु आपल्या घरी चल. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझी मुलगी माझ्या पत्नीला म्हणत होती की, मी इथे सुखी आहे मी येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या मुलीच्या शेजारच्या लोकांकडून तिला आणण्याचा प्रयत्न केला होता, परंतु, तिने शेजारच्या लोकांना नकार दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी परत येत नसल्यामुळे तिला परत आणण्यासाठी नियोजन करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीने रोहीत त्रास देत असल्या संबंधात कोणतीही तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या मुलीला त्रास देत असल्याचे माहीत झाल्यावर मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी आरोपीकडे राहू नये असे मला वाटत होते.

४. मी फिर्याद देताना "त्यावेळी माझ्याकडे कृषीकेंद्रातील दोन व्यक्ती पैसे मागण्याकरिता आले होते, त्यावेळी माझ्या घरी कोणी नसल्याने मी त्यांना घेवून चहा पाणीकरिता ठेल्यावर गेलो'', ही बाब सांगीतली होती. मी फिर्याद देताना "त्यामुळे मी खाली बसलो'', ही बाब सांगीतली होती. मी फिर्याद देताना कृषीकेंद्रातील दोघी व्यक्तीनी मला पोलीस स्टेशनला नेले'', ही बाब सांगितली होती. मी फियार्द देताना "तेथे पोलिसांनी माझी परिस्थिती बघून मला प्रथम ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे पाठविले'', ही बाब सांगितली होती. वरील बाबी माझ्या फिर्यादीत का नाही याचे कारण मी सांगू शकत

नाही. माझ्या कपड्यावर रक्त सांडले होते. हे मी सांगु शकत नाही की, त्यावेळी जमिनीवर रक्त सांडले होते. मी रक्तांनी भरलेले कपडे पोलिसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कानाला रक्त लागले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला पानठेल्यावर लाकडी काठ्यांनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मारहाणीमुळे माझ्या कानाला व पाठीला मार लागला, हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहिती नाही की, तथाकथीत घटनेबाबत माझ्या मुलीला व पत्नीला कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दोन ते तीन महिण्यानंतर माझे पत्नीने माझ्या मुलीला समजावून घरी आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी माझ्या घरी आल्यानंतर आरोपी काही बोलले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी स्वतःहून घरी आली, हे मी खोटे सांगत आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मुलीचे दुसरे लग्न लावून दिले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रोहीतची माझ्या मुलीसोबत कायदेशीर सोडचिठ्ठी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी आरोपीकडे एक वर्ष राहिली. साक्षीदार सांगतो की, माझी मुलगी आरोपीकडे आठ महीने राहीली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीच्या दुसऱ्या लग्नाच्यावेळेस आरोपीने व्यत्यय आणला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी दुसऱ्या पतीसोबत राहत असताना आरोपी तिला त्रास देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सुबाबळीची काठी, वेळवाची काठी व बाबळीची काठीमध्ये फरक समजते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या वेळवाच्या काठ्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या दोन फुट लांब आहे व दोन ते तिन इंच गोलाईचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या आपटल्यास मोडू शकतात. हे

म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या खेड्यात कुठेही भेटतात. हे म्हणणे खरे नाही की, कुठल्याही काठीने मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्यांनी मला मारहाण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्यांनी मला मारहाण झाली हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २६.०८.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.